मासिक शिक्षणयात्री
वर्ष: ८ वे
अंक: ९ वा
सप्टेंबर २०२२
किंमत: ४० रूपये




WARNING

# अंतरंग


**वर्गात गुरुंजीचा फोटो योग्य की अयोग्य?**
प्रतिसाद/३

**प्रतिष्ठा जपण्यासाठी**
ह.ना.जगताप/६

**मास्तर ची मास्टर की!**
प्रशांत सुसर/९

**आमुची गोदावरी**
सुनिता धनगर/१२

**प्रेम**
विजय गायकवाड/१४

**अडगळीतले मान पत्र**
शशिकांत हिंगोणेकर/१६

**प्रेरणेचे पंख**
युवराज माने/१८

**स्वातंत्र्याचा गौरव**
संतोष पाटील/२०

**माहेरची साडी**
सचिन पत्की/२०

**स्नेहमिलनाचा आनंद**
एम.के.भामरे/२२

**माझी शाळा माझे उपक्रम**
भटु शेवाळे/२३

**आम्ही निधड्या छातीचे**
नंदा हरम/२४



**समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...**

मासिक
# शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ७ वे अंक: ९ वा सप्टेंबर २०२२

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-** **त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे



संपर्क पत्ता-
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)
मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी
उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे
संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार
अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे
मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार
मुखपृष्ठ
साभार आंतरजाल
कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील



लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी अ‍ॅक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.

संवाद



*सुभाषदादा कुलकर्णी*
*संपादक*

## आमचे गुरुजी!

सध्या तरी शालेय शिक्षण विभागाचा अजबच कारभार पहायला मिळतोय.नवनवीन उपक्रम म्हणा की आदेश यांना काही आधारच उरला नाही असे म्हणायला हरकत नाही.कारण तसेच घडते आहे.

आता बघा,गुरुजींचा फोटो म्हणे वर्गात लावा.फोटो वर्गात लावून काय साधणार? यातून मुलांना कोणती नि कसल्या प्रेरणा मिळणार? महापुरुषांच्या फोटोजवळ गुरुजींचा फोटो पाहून मुलांना जयंती,पुण्यतिथी साजरी करावीशी वाटली तर नवल वाटायला नको . काही मुले तर फोटोंना हार अगरबत्ती वहातील. यातून कधीतरी गुरुजींना जिवंतपणी आपला फोटो सोहळा बघायला मिळणार हे नक्की.

फोटो लावण्याचे कारण काय तर,कुणा शाळेत खरे गुरुजी वर्गात न येता खोटे गुरुजी वर्गात आले. मग अशा खोट्या गुरुजींना तेव्हाच शिक्षा करायला हवी.अधिकारी मंडळीनी लक्ष देऊन कारवाई करायला हवी.जेणेकरुन नंतर अशी फोटोची टुम निघाली नसती.आणि मुलं, गावकरी नाहीत काय हो? त्यांना कळेल की खरे-खोटे गुरुजी कोण आहेत?

शासनाने आमचे गुरूजी हा फोटोचा उपक्रमाचा आदेश मागे घेतला असला तरी फोटोची चर्चा मात्र साऱ्या वर्गासोबत मोबाईलवरील समाजमाध्यमांवर चांगलीच रंगली.

त्यातच शिक्षकांच्या मुख्यालयी रहाण्याचा विषय ऐरणीवर आला.घरभाडे भत्ता बंद करा यावर आदेश निघू लागले. पण काळ बदललाय.पूर्वीप्रमाणे रस्ते,वाहतूक व्यवस्था राहीली नाही.अर्धा पाऊण तासात शाळेच्या ठिकाणी जाणं शक्य झालंय.शालेय वेळात कामकाज करुन गुणवत्ता राखणारे अनेक उपक्रमशील गुरुजींचे सत्कार होताहेत अशावेळी मुख्यालयाचा मुद्दा गौण. केवळ प्रसिध्दी साठी नि त्रास देण्याच्या हेतूने तर हा मुद्दा येत नाही. आणि मंत्रालयापासून ते गाव पातळीपर्यंत सर्वच कर्मचारी तीस चाळीस किलोमिटर अंतराच फरकाने राहतात.अशावेळी सर्वांचे घरभाडे बंद करा, नाहीतर मुख्यालयापासून तीस चाळीस किलोमीटर अंतर ग्राह्य धरा.

अशा काही उपद्रवी चर्चांपेक्षा शालेय विद्यार्थ्यांना, मुलांना लाभदायक ठरेल,गुणवत्ता वाढेल अशा बाबींची चर्चा होऊ द्या.शिक्षकांची शाळाबाह्य कामांची चर्चा करुन ती कमी कशी करता येईल यावर लक्ष द्यायला हवे.

पण उगाच फोटो फ्रेमची चर्चा घडवून, फोटो फ्रेममध्ये शिक्षकांना बंदीस्त करुन ठेवण्यात काही अर्थ नाही.

प्रतिसाद

# वर्गात गुरुजींचा फोटो. योग्य कि अयोग्य?

फोटो लावून काय करणार आहे शासन?काय लवकरच शिक्षकाला कामाच्या व्यापात संपवायचं आणि त्याच्या फोटोला हार घालायचाय का?कोणाला सुचली एवढी सुंदर कल्पना?राजे हो जे वीरपुरुष शिक्षकालाही माहित नसतील त्यांची नावे सुचवा आणि त्यांचा फोटो लावण्यास सांगा आपल्या वर्गात.आणि दरवर्षी त्या वीरपुरुषांना जयंत्या पुण्यतिथ्या आदरपूर्वक साजरा करण्यास सांगा.

**दिलीप बुधाजी गवळे**
शिरपूर जि.धुळे - ९२२६९७५४९५

स्वतः गुरुजीच आपला फोटो लावत असतील तर त्यात कसला सन्मान! हे तर असं झालं कि आपल्याच हाताने आपली पाठ थोपटून घेणे. सन्मान करायचा असेल तर त्या चिमुकल्याचा करा ज्यांना आय कार्ड साठी फोटो काढण्यासाठी पैसे नसतात, गुरुजी आपल्या खिशातून टाकतात.

**राजेंद्र रोहीदास पाटील**
धुळे - ९७६७४८७७२२२

विद्यार्थ्यांच्या शिक्षकांबद्दल मनात आदर असला तर फोटो लावायची गरज नाही हा उपक्रम अयोग्य आहे .शाळेत नेत्यांऐवजी शिक्षकांचे फोटो जास्त प्रमाणात राहतील.

**भारती दामोदर देसले**
शेवाळी - धुळे - ९६२३८५८५००

शाळेमध्ये गुरुजींचा फोटो लावण्यापेक्षा गुरुजी संपूर्ण वेळ विद्यार्थ्यांच्या समोर उपलब्ध असणे हे शिक्षणाच्या आणि मुलांच्या शैक्षणिक भविष्याच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे ठरेल.( तरचं शाळा व शाळेची संकल्पना जिवंत राहील.)विद्यार्थ्यांना शिक्षणातील महत्त्व,मूल्य समोरासमोर सांगणारे गुरुजीच प्रत्येक विद्यार्थ्याला आवडतील.

**आमचे गुरुजी**



स्पर्शातून मानवी संवेदनेमधून विद्यार्थी शिक्षण लवकर समजून घेतात. आयुष्यभर शिदोरी म्हणून सोबत असणारे शिक्षण,जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, शिक्षणाकडे शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन मनस्वीपणे समजावून सांगणारे गुरुजीच जर फोटोत आले,तर विद्यार्थ्यांनाही ते आवडणार नाही. प्रत्येक गुरुजींनी सदैव विद्यार्थ्यांच्या सोबत राहावे म्हणजे विद्यार्थी आणि शिक्षक यांचे हे अभंग नाते चिरंतर टिकून राहील. एखाद्या ठिकाणी अपवादात्मक काही गोष्टी घडतात तर त्या घडलेल्या गोष्टींवर ( मर्यादित ) नियंत्रण ठेवता येवू शकते. पण तोच नियम आपण सर्व ठिकाणी लावू शकत नाही.कारण अपवाद हा असतोच.त्यामुळे ज्या ठिकाणी काही गैरप्रकार घडत असतील तर त्या ठिकाणी योग्य ती कारवाई

गुरुजींचा फोटो शाळेत लावण्यापेक्षा हे जास्त संयुक्तिक ठरेल.सध्या शाळेमध्ये जे फोटो आहेत. तेच सदैव राहू देत. या ठिकाणी दुसऱ्या पर्यायांचा विचार करावा.

**विजय गायकवाड**
हातकंणगले-कोल्हापूर ९५५२१७७४७४

अयोग्यच आहे.दररोज वर्गात अध्ययन करणाऱ्या जिवंत अध्यापन गुरुजींच्या यांचा फोटोची वर्गात गरजच नाही.जिवंत गुरुजी,असायला हवे ! यासाठी अशैक्षणिक कामाचे ओझे कमी करायला हवे.फोटो असला काय नसला काय?गुरुंजीच्या अध्यापनात जिवंतपणा असणे महत्वाचे.म्हणूनच आम्हाला शिकवू द्या अशी आर्तहाक द्यावीशी वाटते.

**कल्याणी भिकाजी जाधव**
शिरपूर-धुळे ९७६४६७३५५३

माझ्या मते, शाळेत शिक्षकांचा फ़ोटो लावणे अयोग्यच आहे..शिक्षण क्षेत्रामध्ये कोणतेही असे निर्णय लावण्यात येऊ नयेत ज्या निर्णयाचा काही एक उपयोग नाही...ज्या कृतीला अर्थ नाही ती कृती करुच नये कारण शासनाने हा निर्णय लागु करण्यामागे कारण असे सांगितले की, आमचे गुरूजी या उपक्रमांतर्गत वर्गात विद्यार्थ्यांसमोर शिक्षकांचा फ़ोटो असला तर विद्यार्थ्यांमधे शिक्षकांविषयी आदर निर्माण होईल...पण माझ्या मते विद्यार्थ्यामध्ये शिक्षकांबद्दल आदर हा शिक्षकांच्या अध्यापनातुन, शिक्षकांच्या वर्तनातून, शिक्षकांच्या कृतितुन आणि शिक्षकांच्या ज्ञानातुन निर्माण होत असतो आदर निर्माण करण्यासाठी फ़ोटो लावणे हा निर्णय मुळात चुकीचाच आहे...फ़ोटो लावल्याने काही साध्य होणार नाही मग फ़ोटो लावायचा कशासाठी ? आपण शिक्षक आहोत प्रत्येक गोष्टीत तर्क लावणे आपले काम आहे म्हणून या सगळ्या गोष्टीमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत काही फरक पडणार नाही याचे आम्ही भान ठेवले पाहिजे...गुणवत्तावाढी साठी आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वत:विषयी आदर निर्माण करण्यासाठी आम्हाला कृतियुक्त व्हावे लागते आणि ती कृती आमच्या वर्तनातुन दिसली पाहिजे हेच त्रिकालाबाधित सत्य आहे...!

**हर्षल देविदास कापूरे**
शिंदखेडा-धुळे ९७६७५२४१७२

शाळेत गुरुजींचा फोटो लावावा की लावू नये ?खरे तर हा प्रश्न हातच्या कांकणाला आरसा असावा का ? असाच आहे.गुरुजींच्या अंगी असलेली कला-कौशल्ये, विद्यार्थ्याप्रत असलेले आपलेपण यामुळे फोटो लावला तरी काही बिघडत नाही पण फारसा फरकही पडणार नाही. शिक्षकाची प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनात असावी.किंबहुना ती असतेच.ज्या प्रतिमेला फोटो-चौकटीची मर्यादा सामावू शकत नाही. ती विशालतम होऊ शकते.अधिकाधिक तेजस्वी आणि मनभावन होऊ शकते. 'शिक्षक विद्यार्थी घडवतात.' हे वाक्य मजेदार आहे.शिक्षक विद्यार्थी घडवतात पण माझा असाही अनुभव आहे.विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या भूकेतून शिक्षकाचीही जडणघडण होते. आपल्या विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण करता करता शिक्षकातील आजन्म विद्यार्थी सतत ज्ञानसाधना करत राहतो.आपल्या बाळाला जसं सारं काही मिळावं असं आईला वाटतं तद्वतच शिक्षक विद्यार्थ्यांशी तदरूप होतो.म्हणून फोटोच्या चौकटीपेक्षाही विस्तीर्ण अशा कर्तव्य-क्षितीजाची गरज आहे.

**आनंद देशमुख**
शिरपूर-धुळे ९८६०६३०२३०

शिक्षकांनी फोटो का लावावा...?शिक्षकांना वर्गात स्वत:चा फोटो लावण्याचे अनाकलनीय, अतार्किक निर्देश आहेत !वर्गात शिक्षकाचा फोटो लावून काय साध्य करणार आहात ? त्यापेक्षा राज्यात शिक्षकांच्या रिक्त जागा भरा. एका शिक्षकाकडे दोन- दोन /तीन-तीन वर्गाचे अध्यापनाचे काम सांभाळावे लागते. अशा परिस्थितीत शिक्षकाने कोणकोणत्या वर्गासाठी फोटो लावायचे! कि गळ्यात फोटो घालून हिंडायचे?सातत्याने असणारी प्रशिक्षणे व अशैक्षणिक कामामुळे विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देता येत नाही. वर्गात शिक्षकांचे फोटो लावण्यापेक्षा प्रत्येक वर्गावर शासनाने शिक्षक नियुक्त करावेत. शिक्षकांची रिक्तपदे प्राधान्याने भरण्यासाठी प्रक्रिया राबवावी.प्रत्येक वर्गाला स्वतंत्र शिक्षक द्या. राज्यात अठरा हजारापेक्षा अधिक शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे कळते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ९०% शाळांत स्वतंत्र मुख्याध्यापक नाही. वर्ग अध्यापनासोबत मुख्याध्यापक

प्रभार आणि कागदपत्रांच्या बजबजपुरीमुळे मुख्याध्यापक म्हणून कामकाज पाहणारे अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी वर्गानुसार स्वतंत्र वर्गखोल्या, आसनपट्ट्या, डेस्क-बेंच नाहीत. शिक्षकांची भरती करावयाची नाही. वर्षानुवर्षे शिक्षकांची पदे रिक्त ठेवायची. एक ना धड असे वेगवेगळे उपद्रवी शैक्षणिक उपक्रम राबवायचे आणि वरून शैक्षणिक गुणवत्ता घसरली म्हणून पुन्हा शिक्षकांनाच अपेक्षित गुणवत्ता प्राप्त नसल्याचे सांगायचे.कशाला हवेत वर्गात शिक्षकांचे फोटो ? स्वतःचा फोटो लावून सन्मान कसा वाढणार आहे? शैक्षणिक धोरण व अंमलबजावणी च्या पद्धतीमुळे शिक्षक वर्गाबाहेर ठेवायचे आणि प्रतिकात्मक फोटो वर्गात लावून त्या फोटोकडे बघून विद्यार्थी शिकणार आहेत का? वर्गात शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रियेतून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया घडते. त्यातून जिव्हाळा, आपलेपणा वाढतो..! फोटो लावून नाही.उद्या जाऊन त्या फोटोला आमच्या जिवंतपणीच विद्यार्थ्यांना पुष्पहार चढवायला सांगू नका म्हणजे कमावले.!महिला शिक्षकांच्या बाबतीत तर हा निर्णय विचित्रच आहे.राज्यात कुठं शिक्षकांनी तोतया शिक्षक ठेवले असतील तर मूळ शिक्षकांना कायमचे घरी पाठवले पाहिजे. पगारपत्रकावरील आणि तोतया शिक्षक अशा दोघांवरही फसवणूक आणि अपहाराचे गुन्हे दाखल केले पाहिजेत. जेलमधे टाकले पाहिजे. इतकं गंभीर चित्र असेल तर आतापर्यंत कारवाई का नाही झाली? त्या ठिकाणची प्रशासकीय यंत्रणा इतकी वर्षे काय झोपा काढत आहे का? या गुन्ह्यात त्यांचाही सहभाग गृहीत धरून कारवाई झाली पाहिजे. उगीच एखादे काहीतरी खुसपट काढून सगळ्या शिक्षकांना बदनाम करु नये.छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, महात्मा फुले, सावित्रीआई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर या युगप्रवर्तक महामानवांच्या शेजारी भिंतीवर जीवंत शिक्षकांना तसबिरीत लटकवू नका.५ सप्टेंबर ला शिक्षक दिनी सन्मान करायचा आणि उर्वरित ३६४ दिवस हेटाळणी करायची हे निषेधार्थ आहे.इतक्या वाईट पद्धतीने शिक्षकांच्या तथाकथित सन्मानाची गरज नाही.

**दिलीप चिंतामणी पानपाटील**
शिंदखेडा-धुळे ९४२२७९८१४९

# लेखकांसाठी सुचना

**१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.**

**२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा ५०० ते १००० असावी आणि लेख संगणकीकृत करून** shikshanyatri11gmail.com. **या मेलवर पाठवावी.**

**३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८)** Shree lipi-Dev708/google marathi/mangal font **फॉन्ट साईज १५ असावे.**

**४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.**

**५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्याससोपी असावी.**

**६. लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्टसाईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.**

**७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.**


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


महाराष्ट्र शासन
उपविभागीय अधिकारी तथा






सुवर्णा



Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

ई अंक (फक्त पी.डी.एफ.) व्दिवार्षिक वर्गणी - ५००

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

**With pay any app**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2021-23

संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261